The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# कवी इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेतील संतांचा प्रभाव

संशोधक **स्वाती बालासाहेब देशमुख,** संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ.अशोक पाठक
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय परतुर

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र भूमीला खूप मोठी संतांची परंपरा लाभली आहे वारकरी संतांच्या साहित्याचा मोठा प्रभाव मराठी भाषेवर झालेला दिसून येतो मराठीची जडणघडणच जणू संतांच्या साहित्यातून झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही संतांच्या सामाजिक परमार्थिक कार्याबरोबर त्यांनी जगोद्धरासाठी निर्मिलेल्या साहित्यातून मराठीच्या विकासाला चालना मिळाली अद्वेतनिष्ठा योगसाधना सहिष्णुता ऐक्य भावना ह्या बरोबर मायबोलीची गोडी व विठ्ठल भक्तीचा लळा संत साहित्यातून मिळतो महाराष्ट्रामध्ये तेराव्या शतकात अनेक संत जन्माला आले संत नामदेव संत ज्ञानेश्वर ह्याच काळातील, मराठी काव्य निर्मितीच्या दृष्टीने "साहित्य सोन्याचा" हा काळ ह्या पार्श्वभूमीवर नाथ ,वारकरी, महानुभव, दत्त ,समर्थ, वीर शैव इत्यादी भक्ती संप्रदायाचे कार्य असाधारण आहे प्रत्येक संतांच्या भक्तीचे वेगळेपण तळागाळातील जनसामान्यांच्या परमार्थिक आकांक्षाच्या इच्छांचा विचार केला धर्म मार्तंडांना दूर ठेवून हा संतांनी धर्मातल्या उणीवा दूर जात करण्याचा प्रयत्न केला महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील विविध प्रांतात संतपुरुषांनी रचलेली गीते ओव्या भारुडे लिखित - मौखिक परंपरेतून आजपर्यंत टिकून आहेत त्या लोकगीतात रचलेल्या गीतात ओव्या मधून निसर्गातील कैक गोष्टींचा उपयोग दिसतो. शेतकरी शेतकऱ्यांच्या कष्टांचे, झाडांचे सौंदर्य संपूर्ण निसर्ग गावगाडा, गावगाड्यातील जनजीवन येते त्यांच्या सुख दुःखाची मांडणी येते विशेषता: सर्व संतांची रचना या बोली भाषेतून येतात .ज्ञानेश्वर, एकनाथ महाराज, संत तुकाराम संत जनाबाई, सावतामाळी, विठोबा खेचर अशा नावांची मांदियाळी येईल म्हणूनच संत साहित्य व ग्रामीण साहित्य यांचा जवळून संबंध येतो.

ग्रामीण बोली भाषेतून लिहिणारे कवी म्हणून इंद्रजीत भालेरावांना आपण ओळखतो त्यांच्या विविध काव्यसंग्रहातून त्यांच्या कविता वर संतांचा प्रभाव जाणवतो तुकाराम जनाबाई कबीर गाडगेबाबा यांच्या इंद्रजीत भालेराव यांच्या वर प्रभाव जाणतो त्याचा अभ्यास विविध कथासंग्रहातून उलगडत जातो.

**उद्दिष्टे :-**

१)संत साहित्य आणि ग्रामीण साहित्यांचा एकमेकांशी असलेला अनुबंध जोडणे

२)संतांच्या रचना मधून ग्रामीण जीवन कशा प्रकार चित्रित झाले आहे त्याचा शोध घेणे

3) ग्रामीण कवी म्हणून इंद्रजीत भालेराव यांच्या कवितेतून आलेल्या संतांच्या विचारांचा उहापोह करणे

४)इंद्रजीत भालेराव यांच्यावर संत साहित्याचा असलेला प्रवाह शोधणे.

**गृहीतके-**

१) संतांनी बोली भाषेतच आपल्या रचना लिहिल्या आहेत .

२)संत साहित्याचा उद्देश हा समाजाचे प्रबोधन करणे हा होता

३)संतांच्या अनेक रचनांमधून निसर्ग शेती पीक पाणी यांचा उल्लेख आले आहेत उदाहरणार्थ: संत तुकाराम, संत सावता माळी, जनाबाई इत्यादी

४)ग्रामीण साहित्य हे लोक जीवनाशी नात सांगणार आहे.

५)ग्रामीण साहित्यावर संतांचा विचाराचा प्रभाव आहे .

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोध पेपर मध्ये इंद्रजीत भालेराव यांच्या कविता संग्रहातून संत साहित्याचा अभ्यास करताना ग्रंथालयीन शोध पद्धतीचा उपयोग होणार आहे .समीक्षा ,परीक्षण विचार, प्रस्तुत संशोधनात संत साहित्याच्या कवीच्या साहित्यातून येणारा प्रभाव शोधण्यासाठी कवींच्या कविता संग्रहाचा अभ्यास संदर्भ ग्रंथ यांचा अभ्यास होणार आहे.

**संत तुकारामाचा तत्वज्ञानाचा अनुयायी व तुकोबाशी नाते**

मराठी कवितांची परंपरा आणि संत तुकोबारायांचे नाते अतूट आहे संत तुकाराम हे कवी मनाचे होते त्यांच्या काव्यातून ते अधिक सुंदरपणे दिसून येते कवीचे आपले नाते संत तुकारामाशी सांगतो तसे तो "दूर राहिला गाव" मधील दोन अभंगातून सुचवितो , “खरं सांग तुक्या” व “किती आर्त तुझ्या” अभंगातून इंद्रजीत भालेराव यांनी संत तुकारामाशी संवाद साधला आहे .

“खरं सांग तुक्या। तुझा अनुभव
तुला कधी देव ।भेटला का |
निश्चयाचा बळा माविलेस फळ
निश्चयाचा तळ ।गाठलास पांडुरंग तुझा।
झाला का आधार तुझा त्याने भार।वाहीला का”

वरील अभंगातून संत तुकारामाच्या जीवनासंबंधी पडलेले प्रश्न आणि स्वतः तसे जीवन जगतांना महाकवी तुकारामांची झालेली आठवण ,हा प्रसंग आहे कवी थेट संत तुकारामांनाच प्रश्न करतो की तुका तुझा अनुभव सांग खरोखरच तुला देव भेटला आहे का जो जनजागृतीसाठी निश्चयाचा महामेरू झाला त्याचे फळ तुला मिळाले का? सामान्य जीवन व्यतीत करीत असतांना पांडुरंगाचा आधार तुला मिळाला का? संपूर्ण आयुष्याच्या प्रवासात तू एकटा होतास की तुला पांडुरंगाने साथ दिली का त्याचा तुला आधार मिळाला. माझी अवस्था ही तुझ्या सारखी झाली आहे माझाही अवतीभवती मला साथ देईल असं कोणीच नाही ह्या साथीचे साकडे मी कुणाकडे घालू ?

“ किती आर्त तुझ्या गळ्यातले स्वर
किती ताणू तार। विणेची या
काळ गेला पुढे। हा न माझा गुन्हा
जरी पुन्हा पुन्हा ।बोललो मी “

समान पातळीवर जीवन जगत असतांना वेदना ह्या संवेदना होतात संत तुकोबारायांच्या जीवनाच्या परमार्श घेताना कवींना जाणवते की काळ हा तोच आहे परिस्थिती कितीही बदलली तरीही संत आज ही तिथेच आहेत.अगदी बेंबीच्या देठापासून समाज कल्याणासाठी संत अहोरात्र झटत असतात संसाराकडे घर दाराकडे दुर्लक्ष करतात सामान्यातील सामान्य व्यक्तीला सुख मिळावं समाधान मिळावं त्यांचे प्रबोधन व्हावं हा प्रयत्न त्यांचा असतो. काळ बदलतो पण व्यक्तीची प्रवृत्ती बदलत नाही शिरजोर आजही ताठ माने वावरतात आणि चोख्या सारखे संत न केलेल्या गुन्ह्यासाठी मार खातात मुंबाजी आजही आहेत पण पवित्र इंद्रायणी आटत चाललेली आहे, विठ्ठल रुक्मिणी आजही त्याच ठिकाणी विसावलेले आहेत फक्त बदललेला तो काळ आहे. बदललेल्या काळात मात्र बडव्यांचा अवतार तोच आहे आणि निष्पाप भक्तीला ठगणारे बडवे ही आजचे ही तसेचआहेत.

**विद्रोही तुकारामाशी अनुबंध:**

“तुक्या तुझे युद्ध। अधुरे अपुरे
शाबुत खपुरे। पितृत्वाचे
जगला वाचला असतास तरी
मग मना खरी। येत होती”

युद्ध ह्या कवितेत तुकारामाचा विद्रोह हा प्रखर समतावादी असल्याने आजतागायत सनातनी प्रवाहाला गिळंकृत करता आला नसल्याचे दिसून येते गाईचे रक्त पिणाऱ्या गोचडींना मारण्याच्या नादात गाईवर रट्टे देऊन घायाळ केले जात असल्याचे परिवर्तनवादी वैगुण्यांवर नेमके कवीने बोट ठेवले आहे. ज्यांच्यासाठी सुधारणा घडत आहे तो समाज दूर जाताना दिसत आहे गाईचे रक्तपिणाऱ्या गोचडेच बरी असा काळ आला आहे .तसेच वारसा पुढे चालविण्यासाठी पिता पुत्राच्या हातात आपल्या कर्तव्याच्या वसा देत असतो ह्याच डोळ्यांनी संस्कृतीचा वसा कसा चालला हे पाहण्यात येते "तुका कळस झाला "आणि ह्हया पाप विरू संसारातून छन्नीचे घाव शोषण मुक्तही झाला, पण ज्या पुत्राच्या हातात छन्नी दिली त्या पुत्राच्या वाट्याला काय दुःख येत आहे हे पाहण्यासाठी तुका तर लुप्त झालेला आहे.

**विठ्ठल भक्ति आणि शेतीकर्मात गुंतलेला शेतकरी**

“आषाढीला येते ।आभाळ भरून
काळीज कोरून ।जाते माझे
दिंड्या पताकांचे ।गर्जतात भार
आषाढाची धार। कोसळते “

प्रत्येक वारकरी हा बिंदुमय आयुष्य जगत असतो ह्या कवितेतून कवीने आभाळ आषाढाची धार या रूपकातून वारकरी संप्रदायाची बिंदू भक्ती दाखविली आहे.आषाढ महिना म्हणजे पावसाळ्याची सुरुवात, आषाढीची वारी व पेरणी चे दिवस यांचा मेळ सोबतच असतो, पेरणीचे दिवस व वारी जणू गळ्यात गळे घालून आलेली वारी ला तर जायचे असते पण त्याच वेळेला रानात पेरणीही करायची

असते पण पताका दिंड्या गर्जनातच आषाढ्याची धार कोसळते विठू नामाचा गजर चालू असतो आणि इकडे हंगामाची लगबग सुरू असते हरीनामाच्या पताका टाळ्यांच्या गजरात मनओढ घेतो तर वर्षभराच्या तरतुदीसाठी तनाने तो शेतात राबत असतो पण वारीला जायच्या ओढीने मनामध्ये भावनांचा लोंढा येत असतो एवढा शेतकरी विठूमय झालेला असतो की त्याला शेतातील मातीचा वास हा उटीचा वासासारखा येतो. वारीची वाट ही सोपी नसते पायात काटे टोचतात पण मनामध्ये आनंदाच्या लाटा उठतात अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्याला वारीला जाण्यासाठी काय करू आणि कसे करू असे झालेले असते वरील ओव्या मधून कवीने निसर्ग आणि संत ओव्यांचा मेळ बसविलेला आहे मातीचा सुगंध हा उटीचा वासाचा, आभाळ भरून येणं, आणि तसंच काळीज भरून येणं वारीच्या वाटेने पायात काटे टोचतात पण मनात आनंदाच्या लाटा उमटतात निसर्ग सौंदर्य आणि भक्ती सौंदर्य यांची एका दोऱ्यात कवीने माळ विणली आहे.

**संत जनाबाईच्या महती सांगणाऱ्या कवी इंद्रजीत भालेराव यांच्या ओव्या**

संत जनाई हा संपूर्ण महाराष्ट्रातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व करणारे व्यक्तिमत्व होय सर्व स्त्री संतांमध्ये सर्वात प्रसिद्ध असे स्त्री संतत्व होय. थोडक्यात विद्रोही निडरता, खमकीपणा मवाळपणा जनाईच्या व्यक्तिमत्वातून तो दिसून येतो.

अभावात खाई गोता बुडताना झाडी लाथा लाथा लागल्या देवाला काही संतांच्या नावाला खरे तर संत जनाईने काळजाचा ठाव घेणारे अभंग लिहिले आहेत तत्कालीन खालच्या सामाजिक स्तरातून स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणाऱ्या म्हणून संत जनांईची ओळख निर्माण झाली आहे अत्यंत सामान्य जीवनातून अलौकिक अशा यशाची झेप घेणारा जीव म्हणजे जनाई

संत जनाई ह्या पूर्ण निष्काम होऊन त्या पूर्ण भगवंताला शरण गेल्यामुळे स्वतः भगवंत ही त्यांच्यापुढे नतमस्तक होतो संत जनाबाई वर होणारे आळ म्हणजे साक्षात विठ्ठलाला दोषी ठरविणे होईल निर्विकार असणाऱ्या भक्तावर आरोप प्रत्यारोप होतो तेव्हा साक्षात विठ्ठल आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहतो संतत्व बहाल झालेल्या एका सामान्य स्त्री अस्तित्व प्रचलित व्यक्तींना मान्य करता येत नाही किंवा ते पचत नाही त्यावेळेस कुठल्याशा आरोपाखाली त्या व्यक्तीची नाचक्की करून नेस्तनाभूत व्यक्तित्व करता येते, जेव्हा जनाईला बुडवल्या जात होतं प्राणाच्या आकांक्षा ने जीव वाचवताना होणारी तडफड ही साक्षात परमेश्वराची कसोटी होती त्या संतत्वाची कसोटी होती.

"दासी नाम्याची असून टाकी पदराला पुसून
विठू जिचा सांग काम्या काय करेल तो नाम्या"

संत जनाईला अध्यात्माचा साक्षात्कार होण्याच्या आधीच त्या निर्विकार झालेल्या होत्या विठ्ठलावरील प्रेम भक्ती विठ्ठला विषयीचा प्रेमभाव वात्सलता कोमलता त्यांच्या ठाई असली तरीही आईसारख्या त्या हक्काने विठ्ठलाला भांडत ,नाम्या ला बोलत होत्या संत जनाई च्या भक्तीने खुद्द विठ्ठल त्यांच्यासोबत काम करायला येत. संत जनाबाई ह्या शिष्या नामदेवाच्या होत्या पण त्यांची भक्ती एवढी अलौकिक तर होती की नामदेव हे वयाने लहान असल्याकारणाने व ज्यांच्या भक्तीच्या पारड्याने त्या आधी संतत्वाला आल्या त्याचबरोबर प्रत्येक कार्यात कार्य करण्यासाठी खुद्द विठ्ठल त्यांच्या मदतीला येत

होते म्हणजेच नामदेव व जनाबाई हे परमभक्त विठ्ठलाचे पण जनाईचा निरागस निरंकुश प्रेमाने विठ्ठलाचे मन सदैव भरत असे त्या प्रेमापोटीच वेशांतर करून विठ्ठल जनीच्या मदतीला येत होते तिथे त्या नाम्याच्या दासी असल्या तरी खुद्द विठ्ठल येतात म्हटल्यावर तिथे नाम्याचे काय चालणार.

"जनी मोकळ्या केसाची
चंद्रभागेच्या फेसाची
तिचा वाहतो मुसंडा
आव्हानीत उभ्या सांडा"

वरील ओव्यामध्ये कवीने संत जनीचे व्यक्तित्व मांडले आहे थोडक्यात जनीचा स्वभाव इथं ते मांडतात जनी ही अगदी मोकळी आहे मोकळ्या सोडलेल्या केसांसारखी कुठेही बांधलेली नाहीबंधनात अडकलेली नाही,ती मुक्त आहे किंवा तिच्यावर कोणी अंकुश ही ठेवू शकत नाही जणू चंद्रभागा कशी लाटेवर लाटा येऊन तिच्यावरती फेस तयार होतो अगदी त्या फेस सारखी क्षणात रागावणारी आणि क्षणात गायब होणारी लाट आदळली की तिथे फेस निर्माण होतो अगदी जनीच तसंच आहे क्षणात रागवणारी आणि तो राग क्षणात विसरणारी तिला कोणी काही बोललं तर ती प्रतीक्षणाचा विलंब न करता प्रतिउत्तर देणारी व क्षणात मवाळ होणारी.

"तिला मुक्त बारा वाटा
किती होऊ दे बोभाटा
मनमुक्त वाटसरू
जनी सुखाचे पाखरू"

संत जनाबाई चे आयुष्य साधे सोपे सरळ असे नव्हतेच" जया अंगी मोठेपण तया यातना विपुल "म्हटल्याप्रमाणे कायमस्वरूपी आरोपीच्या पिंजऱ्यात जनाबाईचा आयुष्य होतं एका सामान्य तळागाळातील दासत्व पत्करलेल्या स्त्रीच्या आयुष्यात आनंद कसा येऊ शकतो हे समाजमान्य नव्हते किंवा तशी परिस्थिती समाजाला मान्य नव्हती परंतु त्या परिस्थितीला त्या समाजाला चोख उत्तर देत राहिली त्या संत जनाबाई, कारण विठ्ठलावरील तिचा विश्वास आगात, अमाप असा होता आणि तो विठला ने ढळू ही दिला नाही कुठला ही पेच प्रसंग आला तरीही जनाईला त्या उत्तरासाठी त्या प्रपंचासाठी जनाई कडे कायमस्वरूपी उत्तर असायचे त्या कुणाच्या बांधील अशा नव्हत्या त्यांना वाट फुटेल तिकडे जाणाऱ्या वाटसरू व मनाने सुखी असणाऱ्या सुखाचे पाखरू होत्या असे कवी त्यांच्या ह्या ओव्यातून स्पष्ट करतात.

**गोरा कुंभाराच्या भक्तीचा वसा घेणारा बाप**

कवी इंद्रजीत भालेराव यांनी विविध संतांच्या मेळ्यामध्ये गोरा कुंभाराच्या भक्तीचा वसा घेणारा बाप हे "पीक पाणी "हा काव्यसंग्रहातून मांडला आहे .

गोऱ्या कुंभाराने केला मातीमध्ये ।बालकाला
तसा बाप माया करी। माझा होणं मातीची
माझं ओलांडून प्रीत। आधी रुजविल शेत

मग आला स्मशानात।
काळ्याईचं गाणं गात

भक्ती मध्ये भक्ती म्हणजे गोऱ्या कुंभाराची भक्तीमध्ये तल्लीन होत गोऱ्या कुंभाराने रांगत्या बाळाला चिखलामध्ये तुडविले होते इतकी भक्ती मध्ये तल्लीनता की काळ वेळ प्रसंग विसरून विठ्ठलासी एकरूप होणे म्हणजे एकरूपता होय.गोऱ्या कुंभाराच्या भक्तीवर प्रसन्न होऊनच विठ्ठलाने गोऱ्या कुंभाराचे बाळ कुंभाराला परत केले. त्याचप्रमाणे शेतकरी असलेला माझा बाप विठ्ठलावर जशी आगाधभक्ती करतो, प्रेम करतो तसेच माझ्या बापाचे त्याचा काळ्याईवर आगाध प्रेम आहे व्यक्तीच्या आयुष्यातील कर्म व्यक्तीला पूर्ण करावेच लागतात कर्म कोणाला चुकलेले नसतात व्यवहार प्रपंच कुणालाही सुटलेला नाही तो करणे आवश्यकच आहे,कुंभार म्हटले की चिखल तुडविण्याआलेच पण विठ्ठलाचे नामस्मरण करत राहणे हे खऱ्या भक्ताचे कार्य तसेच शेतीवर निस्सीम प्रेम करत राहणे तिची काळजी घेणे हे प्रत्येक शेतकऱ्याचे कर्तव्य गोऱ्या कुंभाराने विठ्ठलाच्या भक्तीत स्वतःच्या मुलाकडे दुर्लक्ष केले पण एका शेतकरी बापाने आपल्या काळ्यामाती साठी मुलाचे प्रेत बाजूला ठेवून अगोदर वर्षभराचे बीज रुजविले ते काम संपल्यावर काळ्याईचे गाणे गात गात तो स्मशानभूमीत आला म्हणजेच शेतकरी हा मुळातच काळ्याई च्या सेवेला प्राधान्य देतो. विठ्ठलावर जशी गोऱ्या कुंभाराची श्रद्धा भक्ती होती अगदी तसेच श्रद्धा भक्ती शेतकरी बापाची त्याच्या शेतीवर आहे विठ्ठल भक्तीचा व काळ्याई वरील उत्कट प्रेमाचे हे उत्तम उदाहरण होय.

**संतभूमी मराठवाड्याची महती सांगणाऱ्या कवी इंद्रजीत भालेराव यांचा "मुलुख माझा"**

महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी आहे किंबहुना ती तशीच ओळखल्या जाते महाराष्ट्राच्या भूमीत भक्तीधारा आहे या भूमीत अनेक संतांनी आपली भक्तिधारा वाढवत महाराष्ट्र भूमी पावन केलेली आहे महाराष्ट्रातील विविध संतांनी आपल्या पंथाद्वारे तत्त्वाद्वारे विविध मार्गाद्वारे समाजात समानता सहिष्णुता आपल्या प्रबोधनाने आणण्याचा प्रयत्न केला आहे संत म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा आरसा होय समाजाला आरशात दाखविण्याचे काम महाराष्ट्रातील विविध संतांनी केले आहे संत हे समाजाला दिशा दाखवण्याचे काम करतात

चक्रधरांनी लीळा मांडणी लळा लाविला येथे नागदेव महादंबा यांचा अनुसार घडला जिथे गुराख्या सही मोक्ष सुखाचा अनुभव येऊ लागे मुलुख माझा मराठवाडा आतुनी नाद निनादे मुलुख माझा सारे रान पृष्ठ ३४० वरून घेतलेल्या कवितेतून इंद्रजीत भालेराव यांनी मराठवाड्याला संतांची भूमिका म्हटले याचे सुंदर शब्दात वेगवेगळ्या संतांच्या नामांचा उल्लेख करून ते स्पष्ट केले आहे चक्रधरांनी लीळा मांडून संपूर्ण महाराष्ट्राला लळा लावलेला आहे त्याचबरोबर ज्ञानेश्वरीचे नातं सांगणारे ज्ञानदेव हे पैठण जवळील आपेगाव चे ह्या बरोबर अठ्ठावीस पर्याय देऊन सत्य सांगणारे मराठीची मुहूर्तमेढ रोवणारे मुकुंदराज ही मराठवाड्यातील च महाराष्ट्राच्या या मुलखात देवाच्या गाभाऱ्यात मृदुंगवाजतो टाळांचा निनाद होतो जिथे नामदेव नाचतो साक्षात विठ्ठल भक्तिमय होतो तिथे नामाच्या गजराने टाळांच्या निनादाने मृदुंगाच्या आवाजाने भूमंडळ ही डळमळतं ह्या बरोबरच जिथे साक्षात विठ्ठल

गुराख्याच्या रूपाने नाम्या ची गुरे सांभाळतो जनीला दळण दळू लागतो तो मुलुख म्हणजे महाराष्ट्र माझा होय

**निष्कर्ष :-**

अशाप्रकारे संतांची प्रासंगीता पाहत असताना कवी इंद्रजीत भालेराव यांच्या साहित्यातून संत तुकाराम संत जनाबाई संत गाडगेबाबा यांच्या कविता ही येतात त्या कविता बोलीभाषेतून येतात ह्या संतांच्या कविता मधून शेतकरी निसर्ग गावगाडा शेतकऱ्याचे दुःख संतांना मिळालेले संतत्व हे दिसून येते.

**संदर्भ:-**

-दूर राहिला गाव
कवी इंद्रजित भालेराव
प्रकाशन
बी रघुनाथ प्रकाशन

-पिकपानी
कवी इंद्रजित भालेराव
मेहता पब्लिशिंग हाऊस

-वेचलेलेल्या कविता(सारे रान) इंद्रजित भालेराव यांच्या समग्र कविता
प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ